ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें<br>वार्षिक वृत्तान्त सन १९५०-५१ |
| लेखक | : | दत्तात्रेय गोपाळ फडके<br>विश्वनाथ धोंडो गोरे शास्त्री |
| प्रकाशक | : | वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें |
| प्रकाशन वर्ष | : | १९५१ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

वेदोऽखिलो धर्ममूलम् । ]     ॥ श्री ॥     [ तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते ।

" धर्मो रक्षति रक्षितः । "

# वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें

( ता. ३०-४-१९२० रोजीं रजिस्टर झालेली )

शके १८७२ सालचा

# वार्षिक वृत्तान्त

वर्ष ७६ वें

[ सन १९५०-५१ ]

2478 (298)

लेखक व प्रकाशक

दत्तात्रेय गोपाळ फडके, बी.ए., एल्‌एल्.बी.
कार्यवाह, वेदशास्त्रोत्तेजक सभा, ७१५/अ१, सदाशिव पेठ, पुणें २

व

वे. शा. सं. विश्वनाथ धोंडो गोरे शास्त्री

(298) आ/१९७

कार्तिक शके १८७३ ]     [ नोव्हेंबर १९५१

[ प्रकाश मुद्रणालय, पुणें २ ]

# शके १८७२ सालीं निवडून आलेलें अधिकारीमंडळ

**अध्यक्ष**—श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य–मठ संकेश्वर, करवीर.

**उपाध्यक्ष**—डॉ. श्रीपाद कृष्ण बेलवलकर, पी. एच्डी., बिल्वकुंज, डेक्कन जिमखाना, पुणें; २ न्यायरत्न नारायणशास्त्री वाडीकर, संस्कृत अध्यापक, ब्रह्मचारी पाठशाळा, महाराष्ट्र सोसायटी, एलिस ब्रिज, अहमदाबाद; ३ महामहोपाध्याय प्रो. दत्तो वामन पोतदार, बी.ए., कल्याण, ७७ शनवार पेठ, पुणें २.

**व्यवस्थापकमंडळाचे सभासद**—(१) श्री. जनार्दन सखाराम करंदीकर बी.ए. एलूएल्. बी. माजी संपादक केसरी ७१५ सदाशिव पेठ पुणें २, (२) प्रो. काशिनाथ वासुदेव अभ्यंकर एम्. ए. पेनशनर संस्कृत प्रोफेसर गुजराथ कॉलेज अहमदाबाद ९८१ सदाशिव पुणें २, (३) श्री. सीताराम विष्णु ऊर्फ रावसाहेब केळकर ७४९ सदाशिव पेठ पुणें २, (४) श्रीमंत गणपतराव विनायकराव ऊर्फ नानासाहेब नातू बी. ए. इनामदार ४११ शनिवार पुणें २, (५) ज्योतिषाचार्य रघुनाथशास्त्री पटवर्धन १४० शुक्रवार पुणें २, (६) श्री. कृष्णाजी विनायक पेंडसे पेनशनर अकौंटंट मिलिटरी फॉयनन्स खातें २२३ सदाशिव पुणें २, (७) वे. मू. परशुराम महादेव गद्रे अध्यापक वेदपाठशाळा ३८ बुधवार पुणें २, (८) वे. मू. भालचंद्र वामन करंबेळकर १००० सदाशिव पुणें २.

**कोषाधिकारी**— श्री. धोंडो कृष्ण साठे बी. ए. बी. एससी. ९९ शुक्रवार पुणें २.

**कार्यवाह**—(१) श्री. दत्तात्रय गोपाळ फडके बी. ए. एलएल. बी. ७९ शुक्रवार पुणें २, (२) वेदशास्त्रसंपन्न विश्वनाथ धोंडो गोरे अध्यापक आयाडियल इंग्लिश स्कूल ५१ बुधवार पुणें २

**आयव्ययनिरीक्षक**—जनार्दन महादेव जोशी पेनशनर स्टॅंप हेड क्लार्क डे. जिमखाना पुणें ४.

**परीक्षा मंडळ**—(१) पं. पुरुषोत्तमशास्त्री रानडे, (२) आयुर्वेदरत्न अनंत यज्ञेश्वर जोशी, (३) प्रो. मोहिनीराज लक्ष्मण चंद्रात्रेय, (४) वे. शा. सं. रामचंद्र अंबादास जोशी, (५) आयुर्वेदाचार्य माधव गणेश जोशी, (६) वे. मू. नीळकंठ रघुनाथ गाडगीळ, (७) वे. मू. जगन्नाथ लक्ष्मण पुजारी.

**सभेचे कारकून**—श्री. शंकर सीताराम हिर्लेकर.

---

आ१९९

वेदोऽखिलो धर्ममूलम् । ]        ॥ श्री ॥        [ तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते ।

"धर्मो रक्षति रक्षितः ।"

(ता. ३०-४-१९२० रोजीं रजिस्टर झालेली)

# वेदशास्त्रोत्तेजक सभा

( स्थापना शके १७९७ )

वर्ष ७५-७६ वें

## शके १८७२ सालचा वार्षिक वृत्तान्त

सन १९५०-५१

॥ ॐ ॥

वागीशाद्याः सुमनसः सर्वार्थानामुपक्रमे ।
यं नत्वा कृतकृत्याः स्युस्तं नमामि गजाननम् ॥ १ ॥
यस्य निःश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत् ।
निर्ममे तमहं वन्दे विद्यातीर्थमहेश्वरम् ॥ २ ॥

**प्रास्ताविक**—इंग्रजी अम्मल सुरू झाल्यावर वेदशास्त्रादि प्राच्य विद्यांस मलीनता आली ती घालवून त्या विद्यांचा प्रसार व्हावा या उद्देशानें वे. शा. सं. राम दीक्षित आपटे, वे. शा. सं. नारायणशास्त्री गोडबोले, जनार्दनभटजी अभ्यंकर, वे. मू. जनार्दनाचार्य वळे, न्या.मू. महादेव गोविंद रानडे, श्री. महादेव मोरेश्वर कुंटे, रा.ब. सीताराम विश्वनाथ पटवर्धन इत्यादि नव्या व जुन्या विद्वान् गृहस्थांनीं पुणें येथें भाद्रपद शु. १ शके १७९७ मंगळवार दि. ३१ ऑगस्ट १८७५ रोजीं वेदशास्त्रोत्तेजक सभा स्थापन केली व दरसाल वेदशास्त्रांच्या परीक्षेस येणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा घेऊन पारितोषिकें, प्रमाण-पत्रें व पदव्या देण्याचें ठरविलें. पुढें दि. ३०-४-१९२० रोजीं ही संस्था सन १८६० च्या २१ व्या कायद्याप्रमाणें रजिस्टर करण्यांत आली. या उद्देशानुसार गेलीं ७५ वर्षे सभेचें काम अव्याहत चालू आहे. शके १८७२ सालचा अहवाल पुढें देण्यांत येत आहे. सभेचें वर्ष चैत्र ते फाल्गुन असतें. वार्षिक समारंभ दरसाल चैत्र वद्यांत करण्यांत येतो.

**सांपत्तिक स्थिति**—शके १८७२ सालीं प्रत्यक्ष जमा रु. ३४५१-२-० व प्रत्यक्ष खर्च रु. ४७७८-१३-३. १३२७-११-३ भांडवली खर्च करावा लागला. कारण सभेच्या इमारतींत शौचकूप नवीन बांधावे लागले.

१ **हितकर्ते** —तीन आहेत.

२ **आश्रयदाते** — एकूण साठच आहेत.

३ **आजन्म सभासद**—वर्षारंभीं सभासद २३३ होते. पुढील पांच गृहस्थ नवीन आजन्म सभासद झाले. ते येणेंप्रमाणें:—(१) वे. शा. सं. विश्वनाथ धोंडो गोरे, (२) म. म. दत्तो वामन पोतदार, (३) काशिनाथ महादेव खैर, (४) एकनाथ रामचंद्र गुरुजी, (५) नारायण विनायक ऊर्फ नानासाहेब भोंडे वकील, पुणें. मिळून २३८ झाले. यांपैकीं गोपीनाथ शिवराम आपटे, पांडुरंग केशव शिराळकर हे दिवंगत झाल्याबद्दल सभेस दुःख होत आहे.

४ **वर्गणीदार** – वर्षारंभीं संख्या २४७ होती. तीन नवीन झाले. मिळून २५०. पैकीं ६ मयत व १३ वर्गणी न दिल्यामुळें कमी झाले. त्यामुळें वर्षअखेर संख्या २३१ राहिली.

**विशिष्ट देणगीदार**—वर्षारंभीं १०६ होते. नवीन देणगीदार काशिनाथ वामन चितळे व त्र्यंबक गणेश जोशी. मिळून १०८ झाले. श्रीकृष्ण गोपाळ जोशी यांचे स्मरणार्थ श्री. गणेश बळवंत जोशी यांनीं रु. १०० दिले.

## शके १८७२ मध्यें साधारण सभा, व्यवस्थापकमंडळ व परीक्षामंडळ यांच्या ज्या सभा झाल्या त्यांचा त्रोटक वृत्तान्त

**साधारण सभा सहामाही**—मिति भाद्रपद वद्य १२ रविवार दि. ८–१०–५०. सभेस ५१ सभासद उपस्थित होते.

(१) सभेच्या अध्यक्षस्थानीं श्रीयुत ज. स. करंदीकर यांची निवड झाली.

(२) सभेच्या इमारतीस विम्याचा हप्ता जास्त कां द्यावा लागतो त्याचा खुलासा कार्यवाहांनीं केला. इमारत शेजारच्या इमारतीस चिकटून आहे.

(३) सभेच्या अधिकारी मंडळ, व्यवस्थापक मंडळ, परीक्षामंडळ यांच्या त्रैवार्षिक निवडणुका करण्यांत आल्या.

(४) व्यवस्थापक मंडळाकडून विद्यार्थी लक्ष्मण विनायक सप्रे यांस थोडे कमी गुण आहेत तरी शिष्यवृत्ति द्यावी अशी शिफारस आली होती त्यास मान्यता देण्यांत आली काशीचे वे. मू. सोमनाथ भट पेटकर यांस वाटखर्चाकरितां रु. २० द्यावे या शिफारशीस मान्यता देण्यांत आली. त्याचप्रमाणें काशीचे वे. मू. विश्वनाथ वामन देव यांस घनाचे अभ्यासाकरितां अधिक एक

वर्ष शिष्यवृत्ति द्यावी व त्यांस शके १८७४ चैत्रांत परीक्षेस बसण्यास सांगावें या शिफारशीस मान्यता देण्यांत आली.

**साधारण सभा-वार्षिक**—मिति फाल्गुन शुद्ध १० रविवार दि. १८–३–५१. एकंदर २६ सभासद उपस्थित होते.

सभेपुढील मुख्य काम जमाखर्चास मान्यता देणें हें होतें. दुरुस्ती, ग्रंथ-खरेदी, पगार व मदत या खात्यांत अंदाजापेक्षां जास्त खर्च झाला त्यास मान्यता देण्यांत आली. शके १८७३ सालाचें आयव्ययपत्रक मान्य करण्यांत आलें.

## व्यवस्थापक मंडळाच्या सभांचें वृत्त

**सभा पहिली**— मिति ज्येष्ठ वद्य १० शनिवार दि. १०–६–५० सभेची वेळ होऊन गेली तरी चारच सभासद उपस्थित होते. अर्धा तास वाट पाहून सभा दि. १७–६–५० पर्यंत तहकूब करण्यांत आली. तहकूब सभेस पांच सभासद उपस्थित होते.

(१) सभेचा वार्षिक वृत्तान्त सभेपुढें ठेवण्यांत आला. तो छापण्यास मान्यता देण्यांत आली. चौकशी केलेल्यांपैकीं आदर्श मुद्रणालयाचा खर्चाचा आंकडा कमी असल्यामुळें त्या मुद्रणालयाकडे अहवाल छापण्यास द्यावा असें ठरलें.

(२) शिष्यवृत्तींकरितां आलेल्या अर्जांचा विचार होऊन खालीं दिलेल्या शिष्यवृत्त्या मान्य करण्यांत आल्या.

(१) वि. विश्वनाथ वामन देव–ऋ. वेदपठन इ. ३ रु. ९६

(२) वि. लक्ष्मण विनायक सप्रे-धर्मशास्त्र २ री रु. ६०

(३) वि. रामचंद्र सदाशिव फणसळकर ऋ. वेदपठन इ. ३ रु. ९६

(४) वि. लक्ष्मीकांत रामाचार्य पुराणिक शु. य. वेदपठन इ. ३ री रु. ६०

(५) वि. सोमनाथ भट पेठकर यांस काशीहून यावें लागलें. त्यांनीं वाट-खर्च मागितला. त्यास रु. २० द्यावे अशी साधारण सभेस शिफारस करण्यांत यावी.

(३) पुणें संस्कृत कॉलेज ॲसोसिएशनकडून मदतीची मागणी करणारें पत्र आलें. त्या संस्थेस रु. १२० मदतीदाखल द्यावे असें ठरलें.

**सभा दुसरी**—मिति श्रावण वद्य ७ रविवार दि. ३–९–५०. सात सभासद उपस्थित होते.

(१) शिष्यवृत्तींकरितां आलेल्या अर्जांचा विचार करणें राहिलें होतें त्यांचा विचार होऊन.

१ वि. गोपीनाथ गंगाधर केळकर सांख्यक रु. ६०

२ वि. पुरुषोत्तम शिवराम शिकेरकर—न्याय रु. ६९

यांना शिष्यवृत्ति चालू ठेवण्याचें मान्य करण्यांत आलें.

(२) साधारण सभा भाद्रपद वद्य ८ रविवार दि. ८–१०–५० रोजीं घ्यावी. त्या वेळीं अधिकारी मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुका करण्यांत याव्या. त्यासंबंधीं आवश्यक ती व्यवस्था करावी.

(३) सभेचे कारकून श्रीयुत शं. सी. हिर्लेकर यांच्या दि. १०।६।५० च्या अर्जाप्रमाणें रु. ४ माहे जून १९५० पासून वरभाड्यांत वाढ देण्यांत आली.

**सभा तिसरी**—मिति कार्तिक वद्य ४ मंगळवार दि. २८–११–५०. नऊ सभासद उपस्थित होते.

(१) श्रीयुत ज. स ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर यांची एक वर्षाकरितां कार्याध्यक्ष म्हणून निवड करण्यांत आली.

(२) जिन्यास ट्रेलिस व सज्जाचे दक्षिण अंगास दार करून बंद करण्यांत यावें. या कामाचे खर्चाचा अंदाज मागवून तावडतोब सुरू करण्यांत यावें.

**सभा चौथी**—मिति माघ शुद्ध ९ गुरुवार दिनांक १५–२–५१.

(१) साधारण सभा फा. शु. १० रविवार दि. १८–३–५१ रोजीं बोलविण्यांत यावी.

(२) वार्षिक परीक्षा चै. व. २ सोमवार दि. २३।४ रोजीं सुरू कराव्या व दि. २९।४।५१ रोजीं बक्षिससमारंभ करण्यांत यावा.

(३) शके १८७२ चा आयव्यय व शके १८७३ चा अंदाजी आयव्यय मान्य करण्यांत आला.

(४) धर्मकोशाचें उपनिषत्कांड भाग दोन व तीन प्रत्येकीं किंमत रु. ३० हे विकत घ्यावे.

**सभा पांचवी**—मिति फाल्गुन वद्य ९ शनिवार दि. ३१–३–५१. सभेस सहा सभासद उपस्थित होते.

(१) पारितोषिकसमारंभाचे अध्यक्षपदाकरितां तीन नांवें सुचविण्यांत आलीं. १ रावबहादुर गणेश गोपाळ ऊर्फ दादासाहेब शेंबेकर, २ प्रा. शंकर वामन ऊर्फ सोनोपंत दांडेकर, ३ प्रा. नरहर गणेश दामले.

(२) परीक्षा समारंभाकरितां व्यवस्थापक—'आनंदाश्रम संस्था' पुणें यांजकडे—

—अथवा प्राचार्य स. प. कॉलेज यांचेकडे जागेची मागणी करावी.

(३) परीक्षेस येणाऱ्या विद्यार्थ्यांची श्रीमती बयाताई बापट यांचे मार्फत जेवणाची सोय होत नसल्यामुळें बादशाही बोर्डिंग ( स. प. कॉलेजजवळील

अथवा बुधवारांतील ) यांपैकीं सोयीचे ठिकाणीं व्यवस्था करावी. सभेमार्फत भोजनाची व्यवस्था आवश्यक असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यामागें रोजीं दोन रुपये खर्च करावे.

## परीक्षा मंडळाच्या सभांचें वृत्त

**सभा पहिली**– मिति चैत्र वा ११ शनिवार दि. १५-४-५०. सहा सभासद उपस्थित होते.

(१) येऊ न शकलेल्या परीक्षकांचे जागीं दुसरे परीक्षक नेमण्यांत आले, त्यांस मान्यता देण्यांत आली.

(२) निरनिराळ्या विषयांतील परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे गुण पाहून निकाल जाहीर करण्यांत आला.

**सभा दुसरी**– मिति श्रावण वद्य १४ रविवार दि. १०-९-५०.

(१) परीक्षेस आलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार एकंदर १९ गुरुजींना रु. २३४ संभावना म्हणून देण्यांत आले.

**सभा तिसरी**– मिति कार्तिक वद्य १ शनिवार दि. २५-११-५०. सहा सभासद उपस्थित होते.

(१) नवीन निवडणुकीनंतर पं. पुरुषोत्तमशास्त्री रानडे यांना परीक्षा-मंडळाचे अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आलें.

**सभा चवथी**– मिति मार्गशीर्ष वद्य १३ शनिवार दि. ६-१-५१. सात सभासद उपस्थित होते. प्रा. का. वा. अभ्यंकर हे व्यवस्थापक मंडळाचे श्री. वामन बाळकृष्ण भागवत टि. विद्यापीठ हे खास आमंत्रणावरून उपस्थित होते. संस्कृत पाठशाळांच्या पुनर्व्यवस्थकरितां मुंबई राज्यानें एक समिति नेमली आहे, तिच्याकडून आलेल्या प्रश्नमालिकेस उत्तर देण्याकरितां सदर सभेंत विचार होऊन सभेचा अभिप्राय व सर्व पाठशाळांना समान अशा अभ्यासक्रमाची रूपरेषा पाठविण्यांत आली. सभा ६-१ व ९-१-५१ अशी दोन दिवस चालली.

**सभा पांचवी**– मिति माघ शु १० शुक्रवार दि. १६-२-५१. पांच सभासद उपस्थित होते. दोघांचीं पत्रें आलीं होतीं.

(१) शके १८७३ च्या परीक्षांचे वेळीं वक्तृत्वाकरितां आगाऊ प्रसिद्ध करावयाचे विषय ठरविण्यांत आले.

१ ब्राह्मण्यं कथं रक्षितव्यम् । २ जीवनवस्तुदौर्भिक्ष्यम् ।

३ धर्मनिर्णयमंडलस्य संस्कारप्रयोगाः युक्ताः अयुक्ताः वा ।

सभा सहावी— मिति फाल्गुन वद्य ११ सोमवार दि. २-३-५१. विद्यार्थ्यांकडून परीक्षेस बसण्याकरितां एकूण ३९ आवेदनपत्रें आलीं. पैकीं ३७ मान्य झालीं. निरनिराळ्या विषयांकरितां आवश्यक ते परीक्षक नेमण्यांत आले.

त्यांपैकीं कांहीं येऊं न शकल्यामुळें त्यांचे जागीं दुसरे परीक्षक नेमण्यांत आले.

## परीक्ष्य विद्यार्थ्यांची विषयवार संख्या
## शके १८७३

| विषय | आवेदनें आलीं | परीक्षेस बसले | उत्तीर्ण |
|---|---|---|---|
| १ ऋ. वेदपठन | ३ | ३ | ३ |
| २ व्याकरण | १ | ० | ० |
| ३ न्याय | ४ | ३ | ३ |
| ४ अ वेदान्त | २ | २ | २ |
| ५ सांख्य | १ | १ | १ |
| ६ ज्योतिष | १ | १ | ० |
| ७ साहित्य | १ | १ | १ |
| ८ काव्य | ४ | ३ | ३ |
| ९ प्रवेश | १० | १० | ८ |
| १० नित्यकर्म | १५ | १३ | १० |
| ११ वक्तृत्व | ५ | ५ | ४ |
| १२ गीतापठन | ७ | ५ | ४ |
| | ५४ | ४७ | ३९ |

यांपैकीं प्रवेशास बसून शास्त्रांत बसलेले सहा व नित्यकर्मांत दोन इयत्तांत बसलेले दोन आहेत.

परीक्ष्य विद्यार्थ्यांचें स्थळवार वर्गीकरण— भडकंबें १, तिरुपती १, कोल्हापूर १, कर्की १, म्हैसूर २, हुबळी २, कऱ्हाड ४, वाई १, सांगली १, पंढरपूर ६, आचरें १, पुणें ३३, मिळून ५४.

## शके १८७२ सालाचा
## पदवीदान व पारितोपिकवितरणसमारंभ

सभेचा वार्षिक पदवीदान व पारितोषिकवितरणसमारंभ चैत्र व. ९ रविवार दि. २९-४-५१ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां आनंदाश्रमाच्या सभागृहांत रा. ब. गणेश गोपाळ उर्फ दादासाहेब शेंबेकर (बारामती) यांचे अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. सुरवातीस भारत गायन समाजाचे श्री. अष्टेकर

यांचें ईशस्तवन व सुश्राव्य गायन अर्धा तासपर्यंत झालें. नंतर सभेच्या परीक्षा मंडळाचे अध्यक्ष पं. पुरुषोत्तमशास्त्री रानडे यांचें गीर्वाण भाषेंत स्वागतपर भाषण होऊन त्यांनीं अध्यक्षांची ओळख करून दिली. ती करतांना त्यांनीं अध्यक्षांच्या अंगच्या तीन प्रमुख गुणांचें मार्मिक वर्णन केलें. ते तीन गुण म्हणजे वैदिक धर्माभिमान, कृषिनैपुण्य व दातृत्व. ब्राह्मणांनीं कृषिकर्म करण्यास ऋग्वेदांत आधार असल्याचें त्यांनीं दाखवून दिलें. पं. रानडेशास्त्री यांनीं केलेल्या सूचनेस पं. गोरेशास्त्री यांनीं अनुमोदन दिलें. नंतर अध्यक्ष स्थानापन्न झाले. कार्यवाह श्री. द. गो. फडके यांनीं शके १८७२ सालचा अहवाल थोडक्यांत निवेदन केला व गेल्या ७५ वर्षांत सभेचा व्याप कसकसा वाढत गेला तें सांगितलें. सहकार्यवाह पं. गोरेशास्त्री यांनीं १८७३ सालच्या परीक्षेसंबंधीं सर्व अहवाल सादर केला.

परीक्षक पं. श्रीनिवासशास्त्री व श्री. पराष्टेकर यांचीं सभेच्या कार्याबद्दल गौरवपर भाषणें झालीं. श्रीनिवासशास्त्री यांनीं संस्कृत अध्ययनाचें महत्त्व व सभेनें गेलीं ७५ वर्षें वेदशास्त्रांच्या अध्ययनास दिलेल्या उत्तेजनाबद्दल संस्कृत भाषेंत सभेस धन्यवाद दिले. श्री. पराष्टेकर यांचें मराठींत भाषण झालें. त्यांनीं सभेच्या कार्याचा गौरव केला. हल्लीं विद्यार्थ्यांचा कल पाली व अर्धमागधी या भाषांकडे आहे. जुन्या पद्धतीनें संस्कृत अध्ययन करणारांची संख्या कमी होत आहे. त्याकरितां पारितोषिकांची रक्कम वाढविण्यांत यावी व सभेच्या कार्यास जास्त प्रसिद्धि द्यावी. सभेच्या परीक्षांस सरकार व विद्यापीठें यांजकडून मान्यता मिळण्याचा प्रयत्न करावा.

**पदवीदान**—नंतर अध्यक्षांचे हस्तें उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदव्या, प्रमाणपत्रें व रोख पारितोषिकें देण्यांत आलीं.

**अध्यक्षांचें भाषण**—आजच्यासारख्या पदवीदानसमारंभास माझ्यासारख्या गुळाच्या गणपतीस कां आमंत्रण दिलें हें समजत नाहीं. प्रथमतः हें पद स्वीकारण्याची माझी तयारी नव्हती. परंतु वेदविद्येचा गौरव करण्यास मला संधि मिळत आहे म्हणून मीं अध्यक्षपदाचा स्वीकार केला. शिक्षण घेणारांत ब्राह्मणवर्गाचें प्रमाण मोठें असतें परंतु त्यांपैकीं शें. ८५ कारकूनपेशा पत्करतात. कृषी, उद्योगधंदे व कारखानदारी यांकडे सुशिक्षितांनीं, विशेषतः ब्राह्मणांनीं, लक्ष द्यावयास पाहिजे. उत्तम शेती, मध्यम धंदा व कनिष्ठ नोकरी अशी पूर्वी म्हण होती. मध्यंतरीं नोकरीस फार तेजी आली व सुशिक्षितांचा सर्व ओघ तिकडे वळूं लागला. सामान्य लोकांची समजूत आहे तशी शेती नुकसानीची नाहीं हें मी स्वानुभवानें सांगतो. विशेषतः हल्लींच्या अन्नधान्यपरिस्थितींत शेती करणें फायद्याचें आहे. सकस व निर्भेळ अन्न, दूधदुभतें व

शांत वातावरण या तीनही गोष्टी त्यामुळें प्राप्त होतात. अशा शांत वातावरणांत वेदाध्ययन करणें सोईचें आहे. त्याला दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागणार नाहीं. शेती करण्यास देखील उच्च शिक्षणाची जरूरी आहे. थोड्या जागेंत अधिक धान्य कसें उत्पन्न करतां येईल हें पाहाण्याकरितां उच्च ज्ञानाची व प्रयत्नांची जरूरी आहे. मुंबईच्या ब्राह्मणसभेनें अशा प्रकारच्या उच्च शिक्षणास प्रोत्साहन दिलें आहे. मोरवीच्या श्री. गणपुले यांनीं स्वतः कारखाना चालवून विद्यार्थ्यांना शिकण्याकरितां शिष्यवृत्त्या ठेवल्या आहेत. परदेशांत शेती-बागायती धंद्यांत फार झपाट्यानें सुधारणा होत आहे. त्याप्रमाणें आपल्या देशांत सुधारणा होण्यास सुशिक्षितांनीं या धंद्यांत पडणें आवश्यक आहे. इत्यादि.

वरील आशयाचें अध्यक्षांचें भाषण झाल्यावर श्री. फडके यांनीं यथोचित मार्गदर्शनाबद्दल अध्यक्षांचे आभार मानले रु. १०१ देणगी देऊन अध्यक्ष सभेचे आश्रयदाते झाल्याबद्दल सभेतर्फे त्यांना धन्यवाद देण्यांत आले. इतर वक्त्यांनीं सभेस सूचना केल्या व सभेच्या कार्याबद्दल आपुलकी दाखविली याबद्दल त्यांचे आभार मानण्यांत आले. तें करतांना सभा सालोसाल शिष्यवृत्तीची रक्कम वाढवीत आहे व पारितोषिकांच्या रकमेंत सभेनें सध्यांच्या आर्थिक परिस्थितीकडे लक्ष देऊन वाढ केली असल्याचें निदर्शनास आणलें. शिष्यवृत्ति देण्यांत येत असून आवश्यक तितके विद्यार्थी येत नाहींत असा त्यांनीं खुलासा केला. भारत गायन समाजाचे श्री. अष्टेकरांचे गायनाबद्दल, आनंदाश्रमाचे समारंभास जागा दिल्याबद्दल आभार मानण्यांत आले. येथील एक परोपकारी भगिनी श्री. बयाताई बापट या गेलीं बारा वर्षें सभेच्या परीक्षेस येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेच्या आठवडाभर स्वखर्चानें दोन्ही वेळचें जेवण घालीत परंतु आतां त्या फार वृद्ध झाल्या असून यंदा त्यांची प्रकृति ठीक नसल्यामुळें विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था सभेस स्वखर्चानें करावी लागली. नंतर उपस्थित श्रोत्यांचे हार्दिक आभार मानण्यांत आले. समारंभाच्या व्यवस्थेचे कामीं सभासद श्री. नी. पु. जोगळेकर यांचे आभार मानण्यांत आले.

सभेच्या परीक्षांस मान्यता मिळविण्याबद्दल सरकार व विद्यापीठ यांचेकडे प्रयत्न करण्यांत येत आहे असा श्री. फडके यांनीं खुलासा केला.

नंतर अध्यक्षांस पुष्पहार अर्पण करण्यांत येऊन उपस्थित सज्जनांस पान-सुपारी देण्यांत आली व सर्वांचें रसपान होऊन समारंभ समाप्त झाला.

मिति चैत्र वद्य ९ शके १८७३
रविवार दि. २९-४-१९५१

दत्तात्रेय गोपाळ फडके
विश्वनाथशास्त्री गोरे
कार्यवाह

टीप—सभेचा निधि सरकारी रोख्यांत गुंतविला जातो. आजपावेतों निधि ३½ टक्के रोख्यांत होता. आतां सरकारी व्याज ३ व २॥ १२ असें झालें आहे. त्यामुळें देणगीदारांच्या रकमांचें व्याज कमी येऊं लागलें आहे. त्याखेरीज सभेच्या नवीन दुरुस्त घटनेच्या नियमाप्रमाणें कार्यालयाचे खर्चाकरितां रकम कापून घेऊन बाकीची बक्षिसांप्रीत्यर्थ दिली जाते. ती वजा जाऊन जी शिल्लक राहते ती शिष्यवृत्ति घेणाऱ्या विद्यार्थ्याला द्यावयाच्या रकमेंत अंतर्भूत केली जाते. अशी शिष्यवृत्तींची रकम प्रत्येक विद्यार्थ्यामागें रु. ६० अथवा ९६ अशी असते. त्यामुळें इतकी रकम भरण्यास अन्याच देणगीदारांच्या व्याजाच्या रकमेची भरती करावी लागते. म्हणून तीं सर्व नांवें छापण्यांत येत नाहींत. तेव्हां ज्या देणगीदारांचीं नांवें प्रत्यक्ष पारितोषिकांचे यादींत छापलेलीं नाहींत त्यांच्या रकमा शिष्यवृत्ति खातीं खर्ची घातल्या असें त्यांनीं कृपा करून समजावें.

———

# परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें,

| अ. नं. | क्रमांक | उमेदवाराचें नांव व पत्ता | विषय, इयत्ता व पदवी | तोंडी गुण वेदपठनांत मात्र २०० | लेखी गुण | पारितोषिक रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७९८ | विनायक सीताराम आठल्ये, भडकंबें | ऋ. वेदपठण इ. ३ चूडामणि | १७० | ० | ४८<br>२४ | ४ |
| २ | १७९९ | गणेश कृष्ण जोशी, पुणें | इ. २ कोविद | १४० | ० | २४<br>१२ | ३ |
| ३ | १८०० | प्रभाकर हरि जड्ये, पुणें | ,, | १०० | — | २२<br>११ | ३ |
| ४ | १८०१ | पुरुषोत्तम शिवराम शिकरेकर, कोल्हापूर | न्याय इ. २ कोविद | ३५ | १२४ | २५<br>१२॥ | २ |
| ५ | १८०२ | लक्ष्मीकांत पंढरीनाथ जांभोरकर, पुणें | न्याय इ. १ | ३८ | ११६ | १९<br>९॥ | २ |
| ६ | १८०३ | रघुनाथ रामचंद्र जोशी, पुणें | ,, | ३५ | १२० | १९<br>९॥ | २ |
| ७ | १८०४ | नारायण कृष्ण बुखन, कर्की | अ. वेदांत इ. २ कोविद | ३५ | १११ | २४<br>१२ | २ |
| ८ | १८०५ | पांडुरंग रामचंद्र श्रोत्रीय, पंढरपूर | इ. १ | ३४ | ११२ | १९<br>९॥ | २ |

# त्यांचे गुण व त्यांना दिलेल्या पारितोषिकांचा तपशील

पारितोषिक कोणाच्या नांवानें व किती

रा. ब. गणेश विनायक पटवर्धन यांजकडून कै. विनायक विठ्ठल पटवर्धन यांचे स्मरणार्थ रु. २५ + श्री. धोंडो कृष्ण साठे रु. २०, कै. पुरुषोत्तम कृष्ण साठे यांचे स्मरणार्थ. कै. दि. ब. काशिनाथ रामचंद्र गोडबोले स्वतःचे नांवें रु. १८. श्री. सावित्रीबाई भ्र. धोंडो दिनकर आपटे भर्तृस्मरणार्थ रु. ९ + श्री. का. म. खैर रु. ४.

श्रीमंत मोतिलाल माणिकचंद ऊर्फ प्रतापशेट गुजर रु. २० + कै. श्रीमंत बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकर यांचा ए. व.चॅ. ट्रस्ट रु. ६ + रा. का. म. खैर रु. ३ + वे. मू. सखाराम भट येड्डूरकर कुरुंदवाड स्वतःचे नांवें रु. १०.

कै. श्रीमंत बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकर ए. व.चॅ. ट्रस्ट रु. १३ + श्री. द. के. घाणेकर यांजकडून कै. ल. बा. घाणेकर यांचे स्मरणार्थ रु. २० + रा. का. म. खैर रु. ३.

श्रीमंत रघुनाथराव शंकरराव ऊर्फ बाबासो पंतसचीव रु. १३ + कै. रा. ब. रंभाजीराव महाडिक यांजकडून स्वतःचे नांवें रु. ९॥ + श्री. का. म. खैर रु. २ + रा. विनायक महादेव लिमये पुणें यांजकडून कै. डॉ. म. वि. लिमये रु. १५.

कै. रा. ब. रंभाजीराव महाडिक यांजकडून स्वतःचे नांवें रु. १८॥ + श्री. नारायण गणेश गर्दे यांजकडून गणेश कृष्ण गर्दे प्राईज रु. १० + श्री. का. म. खैर रु. २.

श्री. दिगंबर विष्णु केळकर मातोश्री रमाबाई केळकर यांचे स्मरणार्थ रु. १० + कै. शंकर केशव साठे यांजकडून कै. चि. वि. शं. साठे यांचे स्मरणार्थ रु. ८ + रा. ब. बळवंत रामचंद्र सहस्रबुद्धे कन्या काशीबाई इचे नांवें रु. १०॥ + श्री. का. म. खैर रु. २.

श्रीमंत रघुनाथराव शंकरराव ऊर्फ बाबासो पंतसचीव रु. ११ + श्री. शिवाजी मल्हार कुळकर्णी यांजकडून कै. मातोश्री लक्ष्मीबाई मल्हारराव कुळकर्णी यांचे स्मरणार्थ रु. २५ + श्री. का. म. खैर रु. २.

श्री. शिवाजी मल्हार कुळकर्णी यांजकडून कै. मातोश्री लक्ष्मीबाई भ्र. मल्हारराव कुळकर्णी यांचे स्मरणार्थ रु. २० + कै. नारायण चिंतामण फडतरे यांजकडून कन्या सौ. द्वारकाबाई इचे नांवें रु. ८॥ + श्री. का. म. खैर रु. २.

| अ. नं. | क्रमांक | उमेदवाराचें नांव व पत्ता | विषय, इयत्ता व पदवी | तोंडी गुण वेदपठनांत माप्त २०० | लेखी गुण | पारितोषिक रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | १८०६ | गोपीनाथ गंगाधर केळकर, पुणें | सांख्य इ. २ कोविद | ३४ | १०६ | २४ १२ | २ |
| १० | १८०७ | प्रभाकर शंकर जोशी, पुणें | साहित्य इ. १ | ४५ | ९८ | १९ ९॥ | २ |
| ११ | १८०८ | गोपाळ शंकर जोशी, पुणें | काव्य इ. २ कोविद | २८ | ८९ | १६ ८ | २ |
| १२ | १८०९ | मनोहर दत्तात्रय जोशी, पंढरपूर | काव्य इ. १ | ३० | ८५ | १३ ६॥ | २ |
| १३ | १८१० | अण्णया सुब्बण्णा पुजारी, पंढरपूर | ,, | २८ | ७७ | १२ ६ | २ |
| १४ | १८११ | गजानन गोविंदभट फाटक, पुणें | ऋ. नित्यकर्म इ. २ | ८७ | | ६ ३ | १ |
| १५ | १८१२ | श्रीनिवास विठ्ठल केळकर, पुणें | ,, | ७२ | | ५ २॥ | १ |
| १६ | १८१३ | अच्युत जनार्दन बोरकर, पुणें | ,, | ५३ | | ५ २॥ | १ |
| १७ | १८१४ | मनोहर अनंत जोशी, आचरें | इ. १ | ५१ | | | १ |
| १८ | १८१५ | अच्युत जनार्दन बोरकर, पुणें | ,, | ५१ | | ३ १॥ | ० |

## पारितोषिक कोणाच्या नांवानें व किती

कै. रा. ब. बापु पुरुषोत्तम जोशी स्वतःचे नांवें रु. १२ + कै. डॉ. हरी वामन भट यांजकडून कै. वा. के. भट यांचे नांवें रु. १२ + रा. ब. कै. चिंतामण विनायक वैद्य स्वतःचे नांवें रु. १२ + रा. का. म. खैर रु. २.

कै. रा. ब. नारायण गोविंद आपटे रु. १७॥ + श्री. स. गोविंद बळवंत ऊर्फ दाजीसाहेब पटवर्धन यांजकडून कै. आबासाहेब शास्त्री पटवर्धन यांचे नांवें रु. ११ + श्री. का. म. खैर रु. २.

कै. न. चिं. ऊर्फ तात्यासाो केळकर स्वतःचे नांवें रु. ६ + कै. पोयामनी नागस्वामी नटेश अय्यर यांजकडून रु ७॥ + श्री. दत्तात्रय गणेश आगाशे यांजकडून कै. ती. गणेशपंत आगाशे यांचे नांवें रु. १०॥ + श्री. का. म. खैर रु. २.

कै. नरहर रावजी बीडकर स्वतःचे नांवें रु. १५ + रा. बाळकृष्ण मल्हार फडतरे यांजकडून कै. ती. मल्हार महादेव यांचे नांवें रु. ३ + श्रीमती पार्वतीबाई जोगळेकर यांजकडून वे. शा. सं. बाळंभटजी खरे यांचे नांवें रु. १॥ + श्री. का. म. खैर रु. २.

कै. पां. वि. चितळे मुलाचे नांवें रु. १४ + श्रीमती आनंदीबाई भ्र. केशव पेंडसे यांजकडून स्वतःचे नांवें रु. ४ + रा. का. म. खैर रु. २.

रा. मुकुंद कृष्ण परांजपे यांजकडून कै. मातोश्री लक्ष्मीबाई परांजपे यांचे नांवें रु. ५॥ + प्रो. दिनकर बाबूराव परांजपे यांजकडून मातोश्रीचे स्मरणार्थ रु. ३॥ + रा. का. म. खैर रु. १.

रा. मुकुंद कृष्ण परांजपे यांजकडून कै. ती. कृष्णराव परांजपे यांचे स्मरणार्थ रु. ७॥ + रा. का. म. खैर रु. १.

श्री. द्वारकाबाई तपस्वी पुणें यांजकडून कै. ती. नरहर यशवंत ऊर्फ भाऊभटजी दिवेकर यांचे स्मरणार्थ रु. २॥ + रा. बाळकृष्ण अनंत जोशी हल्याळकर यांजकडून बाळाजी हल्याळकर पारितोषिक रु. ३ + श्रीमती जानकीबाई भ्र. लक्ष्मणराव भागवत यांजकडून भर्तृस्मरणार्थ रु. २ + रा. का. म. खैर रु. १.

श्री. गणेश भास्कर गानू यांजकडून कै. ती. केशव हरी गानू यांचे स्मरणार्थ.

| अ. नं. | क्रमांक | उमेदवाराचें नांव व पत्ता | विषय, इयत्ता व पदवी | तोंडी गुण वेदपठनांत मात्र २०० | लेखी गुण | पारितोषिक रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | | विष्णु कृष्णाजी जोशी, पुणें | इ. १ | ७८ | | ४<br>२ | १ |
| २० | | आत्माराम चिंतामण छत्रे, सांगली | ऋ. नित्यकर्म<br>इ. १ | ५५ | | ३<br>१॥ | १ |
| २१ | | श्रीकृष्ण पुरुषोत्तम काळे, पुणें | ,, | ५१ | | ३<br>१॥ | १ |
| २२ | | जनार्दन दामोदर मिरवणकर, पुणें | ,, | ५१ | | ३<br>१॥ | १ |
| २३ | | काशिनाथ नारायण जोशी देवाची आळंदी | शु. य. नित्यकर्म<br>इ. १ | ८० | | ४<br>२ | १ |
| २४ | | गोपीनाथ गंगाधर केळकर पुणें | वक्तृत्व इतिहास | ५५ | | १५ | १ |
| २५ | | शंकर प्रभाकर जोशी, पुणें | तात्कालिक | ६५ | | १५ | १ |
| २६ | | के. एच्. गुडी, हुबळी | पूर्वसूचित | ५६ | | १२ | १ |
| २७ | | विद्याधर विश्वनाथ भिडे, पुणें | ,, | ५० | | ८<br>४ | १ |
| २८ | | कु. कमल यशवंत हिर्लेकर | गीतापठण अध्याय १२ व १५ | | | ५ | १ |
| २९ | | चंद्रशेखर यशवंत हिर्लेकर पुणें | गीतापठण अ० १२ व १५ | ४० | | ५ | १ |

## पारितोषिक कोणाच्या नांवानें व किती

रा. विष्णु नारायण बागूल यांजकडून कै. ती. ना. के. बागूल व मातोश्री यशोदाबाई बागूल यांचे स्मरणार्थ रु. ६ + श्री. का. म. खैर रु. १.

श्री. माधव रामचंद्र पुसाळकर यांजकडून कै. गोविंदराव पुसाळकर वकील जमखंडी यांचे स्मरणार्थ रु. ४॥ + श्री. का. म. खैर रु. १.

रा. नारायण गणेश लोंढे यांजकडून कै. मातामह ब्र. कृष्णशास्त्री राजवाडे यांचे स्मरणार्थ रु. २॥ + श्रीमती पार्वतीबाई भ्र. शं. प्र. जोगळेकर यांजकडून कै. ती. वे. शा. सं. रामभट बाळंभट खरे यांचे स्मरणार्थ रु. २ + श्री. का. म. खैर रु. १.

डॉ. शंकर विष्णु बापट यांजकडून कै. ती. मातामही सत्यभामाबाई देवधर यांचे नांवें रु. ४॥ + श्री. का. म. खैर रु. १.

रा. कोंडो महादेव ऊर्फ दादासो कुमठेकर यांजकडून रा. ब. माधवराव कुमठेकर यांचे नांवें रु. ६ + श्री. का. म. खैर रु. १

श्री. शिवाजी मल्हार कुलकर्णी यांजकडून चि. कै. शंकर शिवाजी कुळकर्णी यांचे नांवें रु. १५ + श्री. का. म. खैर रु. १

कै. रा. ब. गोपाळ हरी देशमुख यांजकडून पत्नी कै. सौ. गोपिकाबाई इचे स्मरणार्थ रु. १५ + रा. का. म. खैर रु. १

श्री. मोरेश्वर सदाशिव ऊर्फ बाबूराव फडके यांजकडून कै. ती. सदाशिव गणेश ऊर्फ बाळूकाका फडके यांचे नांवें बळवंत पारितोषिक रु. १२ + श्री. का. म. खैर रु. १

मेसर्स डी. एस्. भावे ब्रदर्स यांजकडून कै. भा. ब. सहस्रबुद्धे यांचे नांवें रु. ५ + श्री. नागेश रा. भादेकर यांजकडून कै. मातोश्री जानकीबाई यांचे नांवें रु. ३ + कै. श्री. उमाबाई भ्र. केशव बळवंत जोशी श्रीवर्धन यांजकडून कै. रा. ब. दा. ग. पाध्ये यांचे स्मरणार्थ रु. ४ + श्री. का. म. खैर रु. १

श्री. त्र्यं. गो. जोगळेकर पुणें यांजकडून कै. ती. वे. मू. गोविंदभट जोगळेकर यांचे स्मरणार्थ रु. ३ + रा. सीताराम नागेश दातार पुणें यांजकडून आजे ब्रह्मीभूत गंगाधरशास्त्री मणिराम भट दातार यांचे नांवें रु. २ + श्री. का. म. खैर रु. १

रा. हरी गोपाळ आठवले स्वतःचे नांवें रु. ५ + श्री. का. म. खैर रु. १.

| अ. नं. | क्रमांक | उमेदवाराचें नांव व पत्ता | विषय, इयत्ता व पदवी | तोंडी गुण वेदपठनांत मात्र २०० | लेखी गुण | पारि- तोषिक रकम | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० | | कु. आशा भालचंद्र अरण्य पारनेर | गीतापठण अ० १२ ते १७ | ३७ | | ५ | २ |
| ३१ | | माधव कृष्णाजी कुलकर्णी कऱ्हाड | गीतापठण संपूर्ण | २५ | | ७ | १ |
| ३२ | | चंद्रकांत नरहर कुलकर्णी कऱ्हाड | ,, अत्युत्तम | ३७ | | ८ | २ |
| | | **केवळ प्रवेश** | | | | | |
| ३३ | | वासुदेव लक्ष्मण वझे, पुणें | | | | | |
| ३४ | | वसंत दिगंबर नेने, पुणें | | | | | |
| ३५ | | अनंत बाळकृष्ण उपाध्ये, पुणें | | | | | |

पारितोषिक कोणाच्या नांवानें व किती

रा. हरी गोपाळ आठवले स्वतःचे नांवें रु. ५ + श्री. का. खैर रु. २.

कै. दत्तात्रय विष्णु डिके पुणें यांजकडून कै. चुलते ती. रामचंद्र महादेव ऊर्फ भाऊभटजी डिके यांचे स्मरणार्थ रु. ३ + कै. श्रीमती यशोदाबाई भ्र. नरहर बापूजी टोकेकर यांचे स्मरणार्थ रु. ४ + श्री. का. म. खैर रु. १

रा. रघुनाथ चिंतामण सोहोनी पुणें यांजकडून कै. ती. चिंतामण हरी सोहोनी यांचे स्मरणार्थ रु. ३ + रा. गोपाळ गंगाधर दिवेकर यांजकडून कै. ती. गंगाधर गोविंद दिवेकर व कै. गोविंद धोंडो दिवेकर यांचे स्मरणार्थ रु. ५ + श्री. का. म. खैर रु. २

# परिशिष्ट १ लें

## पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेचा शके १८७२ सालचा तक्ता

**जमा**

८६७७४- ९-० शिल्लक पेस्तर
सालाबद्दल
३४५१- २-० जमा सालमजकुरीं
१४१७- ०-० भाडें खातें
१९३-१४-० देणगी
२६९- ०-० वर्गणी
१४६७-१२-० व्याज
८१- ०-० कै. पां.वि.चितळे
१५- ८-० हीरकमहोत्सव
७- ०-० अनामत
३४५१- २-०

९०२२५-११-०

८५४४६-१३-९ **शिल्लक पेस्तर**
५६१५- ६-६ पुणें सें. को-ऑप.
६६२४- ०-३ बँक ऑ. महाराष्ट्र
२००००- ०-० नॅशनल से. सर्टि.
४००००- ०-० गहाणखतावर
१२२७०- ०-० पुणें म्यु.डिबेंचर्स
५०- ०-० पुणें सें.को.शेअर
२२५- ०-० किर्लोस्कर ब्रदर्स शेअर्स
२५०- ०-० मॉडेल मिल्स नागपूर शेअर्स
२००- ०-० धी न्यू प्र. मिल्स शेअर्स
१५०- ०-० ओगले ग्लास वर्क्स शेअर्स
६२- ८-० शिल्लक पेस्तर
८५४४६-१३-९

९०२२५-११-०

**खर्च**

४७७८-१३-३ **सालमजकुरीं खर्च**
१६८०-१४-९ इमारत खातें
५५-१०-० किरकोळ
२३६-१२-० गुरुजी संभावना
११०- ५-३ टपाल
१३२- ८-० कै. नरहर रावजी बीडकर
७०८- ०-० पगार
४२२- ०-० परीक्षा व. समारंभ
५४- ०-० पुस्तकखरेदी
५५९- ०-० बक्षिस
२०८-१५-६ मुद्रण
५०- ०-० वासंतिक रसपान
१३०- ०-० मदत
२७- ०-० विद्वत्संभावना
३५- ०-० कै. रंभाजीराव महाडिक
३४८- ०-० शिष्यवृत्ति
१८- ०-० सं. कॉलेज दि. ब. गोडबोले
२-११-९ वीज

**धों. कृ. साठे**
कोषाधिकारी
**दत्तात्रेय गोपाळ फडके**
**विश्वनाथशास्त्री गोरे**
कार्यवाह

एकूण नव्वद हजार दोनशेपंचवीस रुपये अकरा आणे फक्त.

## परिशिष्ट २ रें

| | | |
|---|---|---|
| **विशिष्ट निधि** | | ५०४५५-४-० |
| गहाणखतावर | ४०००० | |
| नॅशनल से. सर्टिफि. | १०००० | |
| पुणें सें. को-ऑ. | ४५५-४-० | |
| **शाश्वत निधि** | | १५०७९-०-० |
| पुणें सें. को-ऑ. | ५१६०- १-६ | |
| धी बँक ऑफ महाराष्ट्र | ६६२४- ०-३ | |
| पुणें म्युनीसिपल डिबेंचर्स | ३२९४-१४-३ | |
| **चालू निधि** | | १९९११-९-९ |
| नॅशनल सेव्हिंग्ज सर्टि. | १००००-०-० | |
| पुणें म्युनिसिपल डिबेंचर्स | ८९७५-१-९ | |
| निरानिराळे शेअर्स | ८७५-०-० | |
| रोख | ६२-८-० | |
| | | ८५४४६-१३-९ |

रु. ४०००० गहाणखत १२ डिसेंबर १९४६ मुदत १० वर्षें व्याज ४ टक्के
रु. ५२०६-१२-६ प्लॉट नं. २५ खरेदी १७ आक्टोबर १९४०
रु. २६००० इमारत खरेदी २५ डिसेंबर १९४४
म्युनिसिपल डिबेंचर 1000/- each 15 February 1948 to 1978
रु. २०००० नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें खरेदी २३-५-४५ अखेर २३-५-६५

---

वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणें या संस्थेचे शके १८७२ चे हिशेब तपासले. जमेच्या व खर्चाच्या नोंदींचा पावत्या व व्हौचरें यांच्याशीं मेळ घातला. एकंदर हिशेब बरोबर असून व्यवस्थितपणें लिहिले आहेत.

**जनार्दन महादेव जोशी**
आयव्ययनिरीक्षक

---

# परिशिष्ट ३ रें

**विद्वत्संभावना**—वे. मू. दत्तंभट सराळकर रु. २, वे. मू. काशिनाथ महादेव जोशी रु. २, वे. मू. काशिनाथ विनायक जोशी रु. २, व वेदमूर्ति गंगाधरभट लेले यांना जटापारायणाबद्दल रु. २१. एकूण रु. २७.

**गुरुजीसंभावना**—वे. मू. श्रीधरभटजी आळतेकर रु. ३७॥, वे. मू. द. पां. किंजवडेकर रु. ३१॥, वे. मू. रामाचार्य पांडुरंग पुराणिक रु. १९॥, वे. मू. भालचंद्र वामन करंवेळकर रु. ७॥, वे. मू. नरसिंहाचार्य वरखेडकर रु. १६, वे. शा. सं. गोपाळशास्त्री गोरे रु. ११।, वे. शा. सं. मध्वरमणाचार्य गलगली धारवाड रु. ३०, वे. शा. सं. कूर्माचार्य नरसिंहाचार्य गलगली रु. १६, वे. शा. सं. शंकरशास्त्री मारूलकर रु. ११।, वे. मू. दत्तात्रेय वासुदेव शेंड्ये रु, ४॥, वे. मू. हरिभटजी रानडे वाई रु ३।॥, श्री. काशिनाथ वि मोघे रु. ४॥, वे. मू. रामचंद्र स. फणसळकर रु. ७॥, वे. मू. दत्तंभट वासुदेवभट टिळक सांगली रु. ९॥, वे. मू. चिंतामण दत्तात्रय फडके रु. ८, वे. मू. परशुराम महादेव गद्रे रु. ३।॥, वे. मू. गंगाधरभटजी लेले रु. ६।॥, वे. मू. भास्कर विष्णु दीक्षित भिडे रु. ३, व वे. मू. नारायण काशिनाथ लेले रु २।॥. एकूण रु. २३४॥.

## परीक्षा मंडळाची उपस्थिति

### शके १८७३ मध्यें सभा ४ झाल्या.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुरुषोत्तमशास्त्री रानडे | ४ | ६ | श्री. द. गो. फडके | ४ |
| २ | आयुर्वेदरत्न अ. य. जोशी | ४ | ७ | प्रो. मो. ल. चंद्रात्रेय | २ |
| ३ | वे. मू. जगन्नाथ लक्ष्मण पुजारी | ४ | ८ | आयुर्वेदाचार्य मा. ग. जोशी | ३ |
| ४ | वे. शा. सं. वि. धों. गोरे | ४ | ९ | वे. शा. सं. रामचंद्र अंबादास जोशी | • |
| ५ | वे. मू. नी. र. गाडगीळ | ३ | | | |

## व्यवस्थापकमंडळाची उपस्थिति

### शके १८७२ मध्यें सभा ३ झाल्या.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रो. का. वा. अभ्यंकर | १ | ७ | वे. मू. भालचंद्र करंबेळकर | ३ |
| २ | पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन | २ | ८ | श्री. ज. स. ऊर्फ तात्यासाो करंदीकर | २ |
| ३ | वे. मू. परशुरामभटजी गद्रे | ३ | ९ | श्री. स. गणपतराव विनायकराव नातू | ३ |
| ४ | वे. शा. सं. वि. धों. गोरे | ३ | १० | श्री. सी. वि. केळकर | १ |
| ५ | श्री. द. गो. फडके | ३ | | | |
| ६ | श्री. कृष्णाजीपंत पेंडसे | ३ | | | |

## परिशिष्ट ४ थें

# शके १८७२ सालाबद्दल शिष्यवृत्ती

| अ. नं. | विद्यार्थ्यांचें नांव | इयत्ता, विषय | इयत्ता उत्तीर्ण | सुरू वर्ष | परीक्षेस बसणें | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रामचंद्र रंगनाथ वांगीकर पंढरपूर | शु.य. वेदपठण इ. ३ | इ. २ १८६८ | १८७० | १८७३ | ९६ |
| २ | विनायक सीताराम आठल्ये, सांगली | ऋ.वेदपठण इ. ३ | इ. २ १८६३ | १८६९ | ,, | ९६ |
| ३ | पुरुषोत्तम शिवराम शिकेरकर, कोल्हापूर | न्याय इ. २ | इ. १ १८७० | १८७० | ,, | ६० |
| ४ | रामचंद्र सदाशिव फणसळणर, पुणें | ऋ.वेदपठण इ. ३ | इ. २ १८७२ | १८७२ | चांचणी | ९६ |
| ५ | गोपीनाथ गंगाधर केळकर, पुणें | सांख्य इ. २ | इ. १ १८७० | १८७० | १८७३ | ६० |
| ६ | गणेश कृष्ण जोशी, पुणें | ऋ.वेदपठण इ. २ | इ. १ १८६४ | १८६९ | ,, | ६० |
| ७ | लक्ष्मण विनायक सप्रे, पुणें | धर्मशास्त्र इ. २ | इ. १ १८७२ | १८७२ | चांचणी | ६० |
| ८ | विश्वनाथ वामन देव, काशी | ऋ.वेदपठण इ. २ | इ. २ १८७० | १८७० | १८७४ | ९६ |
| ९ | लक्ष्मीकांत रामाचार्य पुराणिक, काशी | शु.य. वेदपठण इ. १ | इ. १ १८७१ | १८७१ | ,, | ६० |

वरीलपैकीं नं. ४ व ६ यांस पुणें येथील शिक्षण प्रसारक मंडळींकडून रु. १२० कै. श्रीमती राधाबाई भ्र. बळवंत रामचंद्र मराठे व कै. बळवंत रामचंद्र मराठे या दोघांचे नांवें मराठे शिष्यवृत्ति प्रत्येकीं रु. ६०.

---

## परिशिष्ट ५ वें

### परीक्षकांची यादी शके १८७३

### विषय २ वेदपठण

१ वेमू. विनायक भट केळकर — नागांव

२ वेमू. महेश्वर भट पाध्ये — कोलधें

३ वेमू. नारायण केशव देव नाशिक

विषय ५ व्याकरण

१ वेशासं. विनायक वासुदेव परांजपे पुणें

विषय ६ न्याय

१ वेशासं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर पुणें

२ वेशासं. श्रीनिवासशास्त्री पुणें

विषय ८ अ. वेदान्त

१ वेशासं. मा. चि. दीक्षित पुणें

२ वेशासं. गोविंदशास्त्री पंढरपुरे पुणें

विषय १३ सांख्य

१ वेशासं. मा. चि. दीक्षित पुणें

२ वेशासं. पांडुरंगशास्त्री गोस्वामी सातारा

विषय १५ ज्योतिष

१ वेशासं. नारायण दामोदर जोशी मुरूड

विषय १६ साहित्य

१ वेशासं. व्यंकटेश लक्ष्मण जोशी पुणें

२ वेशासं. रघुनाथ गणेश पराष्टेकर मुंबई

विषय १७ काव्य

१ वेशासं. व्यंकटेश लक्ष्मण जोशी पुणें

२ वेशासं. रघुनाथ गणेश पराष्टेकर मुंबई

विषय २३ प्रवेश

१ वेशासं. रघुनाथ गणेश पराष्टेकर मुंबई

२ वेशासं. व्यंकटेश लक्ष्मण जोशी पुणें

ऋ. नित्यकर्म

१ वेमू. बंडूभट बेलसरे पुणें

२ वेमू. पद्माकरभटजी शेंड्ये पुणें

शु. य. नित्यकर्म

१ वेमू. गजानन गोपाळ कानगांवकर

गीतापठण

१ वेशासं. व्यंकटेश लक्ष्मण जोशी पुणें

२ वेशासं. रघुनाथ गणेश पराष्टेकर मुंबई

# परिशिष्ट ६ वें

## शके १८७२ मंत्रजागराची यादी

| अ. नं. | तिथि, महिना; वार, तारीख | रक्कम | शाखा | मंत्रजागर कोणाकडून |
|---|---|---|---|---|
| १ | चैत्र शु ११, १८७२. गुरुवार दि. ३०\|३\|५० | ० | ऋ. | कै. वासुदेव विनायक पटवर्धन |
| २ | चैत्र वा ११, १८७२ गुरुवार दि. १३\|४\|५० | १० | हि. | श्री. म. दा. साठे ८५४ सदाशिव, पुणें |
| ३ | वैशाख शु ११, १८७२ शुक्रवार दि. २८\|४\|५० | ० | ऋ. | श्रीमती सगुणाबाई परांजपे ९९ शुक्रवार, पुणें |
| ४ | आषाढ शु ११, १८७२ मंगळवार दि. २४\|७\|५० | १० | ऋ. | श्री. गंगाधर शिवराम अडकर १९५ शनिवार, पुणें |
| ५ | आषाढ वा ११, १८७२ बुधवार दि. ९\|८\|५० | ० | हि. | कै. महादेव बळवंत साठे, माडीवाले प्लॉट, पुणें |
| ६ | भाद्रपद शु ११, १८७२ शुक्रवार दि. २२\|९\|५० | १० | ऋ. | श्रीमती अन्नपूर्णाबाई भ्र. गजानन जोशी, ६८० सदाशिव, पुणें |
| ७ | भाद्रपद वा ११, १८७२ शनिवार दि. २१\|१०\|५० | १० | हि. | श्रीमती पार्वतीबाई लिमये, शिवाजीनगर, पुणें |
| ८ | आश्विन शु ११, १८७२ शनिवार दि. २१\|१०\|५० | १० | हि. | श्री. ज. स. ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर, ६७७ सदाशिव, पुणें |
| ९ | कार्तिक शु ११, १८७२ सोमवार दि. २०\|११\|५० | १० | ऋ. | श्री. दत्तात्रय कृष्ण रबडे, १३१ शनिवार, पुणें |
| १० | कार्तिक वा ११ १८७२ मंगळवार दि. ५\|१२\|५० | १० | हि. | श्री. भास्कर गोपीनाथ आपटे, ९१५ सदाशिव, पुणें |

| अ. नं. | तिथि, महिना, वार, तारीख | रक्कम | शाखा | मंत्रजागर कोणाकडून |
|---|---|---|---|---|
| ११ | मार्गशीर्श शु ११, १८७२<br>बुधवार दि. २०।१२।५० | ० | ऋ. | श्री. का. वा. चितळे,<br>गाडगीळ रस्ता, सदाशिव, पुणें |
| १२ | मार्गशीर्ष शु ११, १८७२<br>गुरुवार दि. ४।१।५१ | ० | ऋ. | वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें |
| १३ | पौष शु ११, १८७२<br>गुरुवार दि. १८।१।५१ | १० | ऋ. | श्री. के. वि. केळकर,<br>रास्ता पेठ, पुणें |
| १४ | पौष वा ११, १८७२<br>शुक्रवार दि. २।२।५१ | १० | हि. | श्री. धोंडो कृष्ण साठे,<br>९९ शुक्रवार, पुणें |
| १५ | माघ शु ११, १८७२<br>शनिवार दि. १७।२।५१ | १० | ऋ. | श्री. शंकर आत्माराम मोघे,<br>बादशाही बोर्डिंग, पुणें |
| १६ | माघ वा ११, १८७२<br>रविवार दि. ४।३।५१ | १० | ऋ. | श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे,<br>२६७ शनिवार, पुणें |
| १७ | फाल्गुन शु ११, १८७२<br>सोमवार दि. १९।३।५१ | १० | हि. | रा. ब. धरणीधर कृष्ण रानडे,<br>६५३ बुधवार, पुणें |

———

## वैदिक धर्माभिमानी जनतेस प्रार्थना

वेदशास्त्रादिकांवर परिश्रम करणाऱ्या विद्वानांची व विद्यार्थ्यांची चार वेद, सहा शास्त्रें, ज्योतिष, वैद्यक वगैरे विषयांत परीक्षा घेऊन तींत जे उत्तीर्ण होतील त्यांस द्रव्यरूपानें पारितोषिकें, संमतिपत्रें व पदव्या यांपैकीं एक अगर अनेक देऊन व निरानिराळया ठिकाणच्या वेदपाठशाळांस व गुरुजींस शक्य तो आश्रय देऊन आर्यविद्येच्या व वेदशास्त्रादिकांच्या अध्ययनास व अध्यापनास हल्लीं सर्वत्र आलेली ग्लानि दूर करावी आणि जुनी विद्या जिवंत ठेवावी या उद्देशानें पुण्यास शके १७९७ सालीं '**वेदशास्त्रोत्तेजक सभा**' स्थापन झाली.

आज ७६ वर्षें सभेनें हें काम अव्याहत रीतीनें व उत्कृष्ट तऱ्हेनें केलें असून केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भारतवर्षांत **संस्कृत विद्यापीठाचें** काम केलें आहे. आजपर्यंत निरानिराळया शास्त्रांत हजारांच्यावर वैदिक, शास्त्री व पंडित सभेच्या परीक्षांत उत्तीर्ण होऊन सर्वत्र पसरले आहेत व ते जनतेस आपल्या ज्ञानाचा फायदा अनेक तऱ्हेनें देत आहेत.

सर्व धर्माभिमानी व वेदशास्त्राविषयीं आदर व आस्था बाळगणाऱ्या सद्-गृहस्थांच्या उदार आश्रयानेंच सभेचें कार्य सिद्धीस जाणार आहे या भरवंशावर सभेनें हें काम अंगावर घेतलें आहे. तरी आपण स्वतः व आपणांस शक्य असेल त्या रीतीनें आर्थिक साहाय्य कराल अशी आशा आहे.

### सभेस मदत करण्याचे प्रकार

( अ ) **हितकर्ता सभासदः**—सभेस एकदम किंवा हप्त्यानें ३०० रुपये अगर त्याहून कितीहि जास्त रक्कम देणगीदाखल देणारे.

( आ ) **आश्रयदाता सभासदः**—सभेस एकदम किंवा हप्त्यानें १०० ते ३०० रुपयांचे आंत रक्कम देणगीदाखल देणारे.

( इ ) **आजन्म सभासदः**—सभेस एकदम किंवा हप्त्यानें ३५ ते १०० रुपयांचे आंत रक्कम देणगीदाखल देणारे.

( ई ) **वार्षिक सभासदः**—सभेस दरसाल १ रुपयापासून कितीहि वर्गणी देणारे.

( उ ) **विशिष्ट सभासदः**—ऐच्छिक रक्कम देणारे.

लग्नमुंज दक्षिणेकरितां मंगलकार्य करणाऱ्या लोकांनीं वेदशास्त्रोत्तेजक सभेची आठवण ठेवून दक्षिणा दिल्याबद्दल सभा त्यांची आभारी आहे. प्रत्येक लग्न-सराईमध्यें मंगलकार्य करणाऱ्या लोकांनीं सभेची अशीच आठवण ठेवून मदत करावी अशी विनंति आहे.

## " वेदशास्त्र-दीपिका "

### वैदिक धर्माभिमान्यांस अपूर्व लाभ

सनातन हिंदु धर्माभिमानी वक्त्यांस व लेखकांस अत्यंत उपयुक्त माहिती-पूर्ण असा ग्रंथ.

### केसरीचा अभिप्राय

"वेदशास्त्र-दीपिका" हा ग्रंथ अतिशय अपूर्व व उद्‌बोधक आहे. एवढा माहितीनें भरलेला ६०० पृष्ठांचा ग्रंथ **चार रुपयांस मिळतो.** आणि त्याचा लाभ जे न घेतील त्यांची गणना 'आळशावर आली गंगा, आणि आळशी पळे न भिजवी अंगा' अशा कोटींतच करावी लागेल.

मिळण्याचें ठिकाण :—

**वेदशास्त्रोत्तेजक सभा,**

७१५/अ१, सदाशिव पेठ, पुणें २.

जावक नंबर

**BOOK-POST**

कार्यवाह, 'वेदशास्त्रोत्तेजक सभा' यांजकडून–(सदाशिव पेठ, ७१५/अ१, पुणें शहर).